# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३ /२०२२**

**विषय : मार्च/एप्रिल, २०२२ (नियोजन जून, २०२२) सम सत्र परीक्षेच्या आयोजनाबाबत.**
**संदर्भ : विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेले निर्णय.**

प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी सर्व अभ्यासक्रमांच्या मार्च/एप्रिल, २०२२ मधील सम सत्राच्या विद्यापीठ लेखी परीक्षा, महाविद्यालय पातळीवरील अंतर्गत सर्व परीक्षा, इनसेम, प्रात्यक्षिक, मौखिक, सेमिनार, मिनी प्रोजेक्टस्, प्रोजेक्ट्स, डेझरटेशन इत्यादी सर्व परीक्षांचे पारंपारिक पध्दतीने (ऑफलाईन) कोविड-१९ पूर्वी आयोजित केलेल्या परीक्षांप्रमाणे विद्यापीठ मान्यताप्राप्त परीक्षा केंद्रांवर माहे जून, २०२२ पासून आयोजन करण्याचा निर्णय विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेला आहे. याबाबत सविस्तर वेळापत्रक, मार्गदर्शक सूचना, परिपत्रके व परीक्षेसंबंधीची इतर माहिती वेळोवेळी विद्यार्थी, संबंधित महाविद्यालये व इतर घटक यांना अवगत करण्यात येईल तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर सदर परीक्षेसंबधीची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच या परीक्षामध्ये श्रेणीसुधार, बी.ए. टू बी.ए., बी.एस्सी.टू बी.एस्सी व इतर सर्व पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षांचे आयोजन वरीलप्रमाणे करण्यात येईल.

मा.प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील माहितीचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकाचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/६९
दिनांक : २४ मार्च, २०२२

प्रति,
१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा